नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 13/10/2020 (मंगळवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत रेल्वे स्टेशन काटोल येथे दिनांक 22/03/2020 ते दिनांक 11/10/2020 चे दरम्यान फिर्यादी नामे— विनोद कुमार गुप्ता, वय 43 वर्ष, रा इद्रायणी नगर, गोरेवाडा रोड, नागपुर यांचे नारायणी इंटरप्रायजेस नावाचे फर्म असुन ते रेल्वे चा ठेका घेवून बांधकाम करतात. त्यांना रेल्वे कॉर्टर चे स्लॅब बांधण्याचे टेंडर मिळाले असुन जाने/2020 पासुन काम सुरू होते. अज्ञात आरोपीने रेल्वे स्टेशन काटोल येथील बांधकामाचे साहित्य व लोखंडी प्लेट वजन 7,548 किलो किं. 87,312/—रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 4 कि.मी. अंतरावरील सावंगी(भे) येथे दिनांक 12/10/2020 चे 13:30 वा. दरम्यान एम.एच— 40/यु— 5223 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक मृतक/आरोपी नामे— प्रवीन हेमराज टोंगे, वय 35 वर्ष, रा. डादेरा ता. कळमेश्वर याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन संतुलन बिघडुन सावनेर ते काटोल रोडवर मौजा सावंगी रोडच्या बाजुला असलेल्या सागवणाच्या व कणेरीच्या झाडाला स्वतः धडक मारुन बाजुला नालीमध्ये आपले वाहनासह पाडला. या अपघातात आरोपी हा स्वतः चे जागीच मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गुणीजन बापुराव टोंगे, वय 44 वर्ष, रा. डादेरा ता. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. सागर करांडे 7722011228 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :— अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील कोथुर्णा शिवार उमंग कॉलेज च्या जवळ येथे दिनांक 11/10/2020 चे 19:00 वा. दरम्यान एमएच— 40/ व्हीएल— 6070 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे— आबीर शेख रशिद शेख, वय 34 वर्ष, रा. अंबाडा वार्ड रामटेक जि. नागपूर याने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे सुरक्षिततेची कोणतीही काळजी न घेता उभा केल्याने एमएच—31/बीएन 435 क्रमांकाचा स्कुटीचा चालक मृतक नामे— तुलाराम रूपचंद पनवारे, वय 60 वर्ष, रा. करंभाड पारशिवनी यांना सदर ट्रक न दिसल्याने मागुन ट्रक ला धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी होवुन उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संजय तुळसीराम लांजेवार वय 35 वर्ष रा. करंभाड ता. पारशिवनी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 283, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. झांबरे 9028748409 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर